वेबसाईट अपलोड तारीख ०७/०२/२०१४

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.


:: प्रधान कार्यालय ::

" मुंबै बँक भवन", २०७, डॉ.दादाभाई नौरोजी रोड,

फोर्ट , मुंबई ४०० ००१,  दूरध्वनी - २२६१७१ ५४ ते ५९


## मजूर सहकारी संस्थांसाठी

# कर्ज धोरण

# मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक मर्यादित.

## मजूर सहकारी संस्थांचे कर्ज धोरण

**३९/१९ वी संचालक मंडळ सभा दिनांक १७/०१/२०१४**
**ठराव क्रमांक : ६** (दिनांक ०५/०२/२०१४ पासून लागू )

### कर्जदार संस्थांसाठी पात्रता निकष

**अ) क्लिन कॅश क्रेडिट :**

बृहन्मुंबईतील ज्या मजूर सहकारी संस्थांना शासकिय हिशेब तपासणीत 'अ' तसेच "ब" वर्ग प्राप्त झाला असेल अशा संस्थाना पात्र स्वनिधीचे ३ पट किंवा रू. १५.०० लाख यापैकी जी कमी असेल एवढीच क्लिन कॅश क्रेडिट मर्यादा एक वर्ष मुदतीने बँकेच्या प्रचलित अटी / शर्तीवर मंजूर करण्यांत यावी

ज्या संस्थांना यापूर्वी उपरोक्त मर्यादेपेक्षा जास्त रक्कमेचे कर्ज मंजूर झाले आहे. अशा संस्थांची मर्यादा कामापोटी मिळणा-या बिलातून १०% प्रमाणे क्र्मात करुन कमी केली जाईल.

संस्थेस बिलापोटी मिळणारे चेक्स संस्था व मुंबई जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक लि. यांचे संयुक्त नांवे काढले जातील. या आशयाची नोंद लेबर फेडरेशनच्या शिफारस पत्रामध्ये असेल अशा संस्थांनाच मंजूर कर्जाची उचल देणेत येईल. तसेच संस्थेस मिळालेल्या कामासंबधी, काम देणाऱ्या वर्क अवॉर्डिग एजन्सी यांचेकडील मुळ वर्क ऑर्डर / काम वाटप समितीच्या पत्रानुसारचे मागील ६ महिन्यांचे येणे बिलाचे रक्कमेच्या ८०% पर्यंत रक्कम उचलीस ग्राह्य धरण्यात येईल.

अवसायनातून पुर्नजिवीत झालेल्या संस्था प्रत्यक्षात कार्यान्वित होऊन ५ वर्षे झालेनंतरच संस्था बँक कर्ज मंजुरीस पात्र होईल.

पुर्नजिवीत तसेच हस्तांतरीत झालेल्या संस्थाच्या प्रथम कर्ज मागणीचे वेळेस, पुर्नजिवन, हस्तांतरणासंबधी आदेशाची संबंधीत उपनिबंधक कार्यालयात सत्यता पडताळण्याचे अधिकार तसेच संस्थेच्या उपविधीत झालेले सर्व बदल उदा. नाव व पत्ता बदल, कार्यक्षेत्र विस्तार, भाग धारण मर्यादा वाढ इ. उपविधी दुरूस्तीची संबंधीत कार्यालयाकडे पडताळणी करण्याचा अधिकार बँकेस राहील.

**टिप -** स्वनिधी म्हणजे (वसुल भाग भांडवल + राखीव निधी + इमारत निधी) - (संचित तोटे.)

१) संस्थेचे पात्र स्वनिधी निश्चित करताना खालील रक्कम एकूण स्वनिधीतून वजा करण्यात येतील.

अ) वैयक्तिक कमाल भाग धारण मर्यादा रु. २०,०००/- पेक्षा जास्त स्विकारलेले भाग.

ब) वाढीव भागाचे स्वतंत्र अर्ज न घेता तसेच वाढीव भागास मासिक सभेची मंजूरी न घेता स्विकारलेले भाग भांडवल.

**कर्ज मागणी अर्जासोबत जोडावयाची कागदपत्रे -**

१. संस्थेच्या पोटनियमाची अद्यावत दुरूस्तीसह सत्यप्रत.

२. प्रथम कर्ज मागणीच्या वेळी संस्थेच्या अध्यक्षांनी प्रमाणित केलेले संस्थेचे नोंदणी प्रमाणपत्र.

३. संस्थेच्या गतवर्षीच्या लेखा परिक्षण अहवालाची तसेच संस्थेने सादर केलेल्या तत्ससंबंधी पूर्तता अहवालाची सत्यप्रत.

४. मागील तीन वर्षाचे वार्षिक अहवाल.

५. संस्थेची अद्यावत आर्थिक पत्रके (तेरीज नफातोटा व ताळेबंद पत्रक)

६. बँक कर्ज मागणीबाबत संस्थेच्या कार्यकारी मंडळ सभेच्या ठरावाची सत्यप्रत.

७. संचालक मंडळ सदस्यांची नावे, फोटो, वास्तव्याचा पुरावा, गावचे पत्ते (पुरावादर्शक कागदपत्रांसह) व दूरध्वनी क्रमांकासह बँकेच्या विहित नमुन्यातील यादी.

८. संस्थेचे कार्यकारीणी सदस्य अन्य संस्थांचे पदाधिकारी/संचालक नसलेबाबतचा विहित नमुन्यातील दाखला.

९. संस्थेला फेडरेशनने शिफारस केलेली संबंधीत कामाचे बिलाचे चेक्स बँक व संस्था यांचे संयुक्त नावाने काढण्यात यावेत अशा स्पष्ट सूचना असलेली पत्रे व कामाच्या वर्क ऑर्डर सत्यप्रती. / काम वाटप समितीचे पत्र (डी.डी.आर. यांचे सहीचे)

१०. इतर अनुषंगिक कागदपत्रे.

**कर्ज उचलीच्या वेळी घ्यावयाची कागदपत्रे / दस्तऐवज -**

१. संस्थेस मंजूर असलेल्या संपूर्ण मर्यादेची विहित "क" नमुन्यातील वचनचिठ्ठी.

२. सातत्य हमीपत्र (आवश्यक त्या किंमतींच्या स्टॅम्पसह)

३. बँकेच्या अटी मान्य केलेल्या ठरावाची सत्यप्रत.

४. कर्ज मागणीच्या कागदपत्रावर सह्या करण्याचा अधिकार प्रदान केल्याबाबतचा संचालक मंडळाच्या ठरावाची सत्यप्रत.

५. कर्ज मंजूरीचे स्विकृती पत्र. (ॲक्सेप्टन्स लेटर)

६. खात्यावर नावे टाकण्याबाबतचे अधिकारपत्र (ॲथोरीटी लेटर टू डेबिट अंकौन्ट)

७. परत न घेता येणारे हमीपत्र (इरेव्होकेबल डेबिट ॲथोरीटी)

८. स्थायी सूचना (स्टॅन्डींग इन्स्ट्रक्शन)

९. वैयक्तिक व संयुक्तीक हमीकरार पत्र (जॉईंट ॲन्ड सेव्हरली बॉंड)

१०. मुक्त्यारपत्र (पॉवर ऑफ ॲटर्नी)

११. वर्क अवॉर्डींग एजन्सीच्या वर्क ऑर्डरच्या सत्यप्रती / काम वाटप समितीचे पत्र
१२. अद्यावत आर्थिक पत्रके

कर्ज मर्यादेचे नुतनीकरण करावयाचे असल्यास कर्जदार संस्थेने मंजूर मर्यादेची मुदत संपण्यापूर्वी २ महिने अगोदर योग्य ते प्रकरण आवश्यक त्या कागदपत्रास बँकेस सादर करणे आवश्यक आहे.

काही अपरिहार्य कारणामुळे, विहीत काळामध्ये संस्था जर नुतनीकरणाचा अर्ज सादर करू शकत नसेल तर मंजुर मर्यादेस मुदत वाढ मिळणेबाबत संचालक मंडळ/ कार्यकारी समितीच्या सभेतील योग्य त्या ठरावानिशी विनंती अर्ज मुदतीत सादर करावयास पाहिजे.

संस्थेस कर्ज नुतनीकरण अर्ज सादर करणेस मुळ मुदतीनंतर एक महिन्याच्या ग्रेस पिरियड देण्यात येईल. मात्र तद्नंतर कर्ज नुतनीकरण अर्ज सादर न केल्यास प्रतीमहा रु.१२००/- लेट फी चार्जेस आकारण्यात येतील.

## क्लिन कॅश क्रेडिट ( मजूर संस्था )

**अटी व शर्ती**

१. संस्थेस कर्ज रकमेच्या ७.५०% टक्के इतक्या रक्कमेचे बँकेचे भाग खरेदी करावे लागतील.

२. संस्थेने गंगाजळीची संपूर्ण रक्कम या बँकेत मुदत ठेवीत स्वतंत्रपणे गुतविल्यानंतरच कर्ज उचल देण्यात येईल.

३. संस्थेने पूर्ण केलेल्या कामाची व नविन हाती घेतलेल्या कामाची माहिती तसेच चालू कामाच्या प्रगतीचा अहवाल, पुढील महिन्यांच्या १० तारखेच्या आत बँकेकडे पाठविली पाहिजेत.

४. प्रत्येक महिना अखेर स्विकृत कामाचा अहवाल बँकेने पुरस्कृत केलेल्या नमुन्यात पाठविला पाहिजे. तसेच दरमहाची आर्थिकपत्रके (तिमाही पध्दतीने) शाखेस सादर करावी लागतील. आर्थिक पत्रके सादर न केल्यास नियमानुसार विलंब चार्जेस आकारले जातील.

५. रोख रक्कम हाताळणा-या कर्मचा-यांबाबत पॅकेज पॉलिसी घ्यावी.

६. संस्थेला बँकेने कळविलेल्या त्रुटींची दोष दुरुस्ती पूर्तता अहवाल नमूद मुदतीत न आल्यास कर्ज खात्यावर उचल दिली जाणार नाही.

७. "बँक कर्ज परतफेडीस संस्थेचे पदाधिकारी व पंचकमिटी सदस्य " जॉईन्टली ॲण्ड सेव्हरली जबाबदार राहतील अशा आशयाचा हमी करार बँकेस सादर करुन द्यावयांस लागेल. तसेच बँकेचे कर्ज बाकी असताना संस्थेच्या पदाधिकारी / पंचकमिटी सदस्यांमध्ये काही बदल झाल्यास सदर हमी करार नव्याने बँकेस सादर करावे लागेल."

८. संस्थेने मंजूर कर्ज मर्यादेवर उचल करतेवेळी मिळालेल्या कामाबाबत वर्क ॲर्वाडींग एजन्सीच्या आदेशाच्या मूळ प्रती / काम वाटप समितीचे पत्र बँकेस सादर करावयास पाहिजे.
९. संस्थेस काम देणा-या संबंधित संस्थांकडून मिळालेली कामे, त्यापोटी मिळालेल्या रक्कमा याबाबतचा तपशील काम देणा-या संस्थेस सादर करुन त्याची एक प्रत बँकेस अग्रेसित करावी. सदरचा तपशील मिळाल्या बाबतच्या पोचपावतीची झेरॉक्स प्रत बँकेस सादर करावी.

१०. महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० कलम ७३ ब ब ब प्रमाणे कार्यकारीणीवर महिला सदस्यांची नियुक्ती/निवड करुन तद्संबधी केलेल्या कार्यवाहीबाबत कार्यकारीणी ठरावासह पत्र सादर करावे लागेल.

११. संस्थेने मंजूर कर्जाच्या उचलीसाठी दोन महिन्यात कर्ज उचल प्रस्ताव आवश्यक त्या दस्तऐवजासह सादर न केल्यास व सदर कर्ज खात्यावर जमाबाकी राहिल्यास मंजूर कर्ज मर्यादा रद्द होईल अथवा येणेबाकी राहिल्यास थकबाकी समजून कर्ज वसुलीस पात्र राहील.

१२. संस्थेस बिलापोटी मिळणारे चेक्स हे बँकेच्या कर्ज खात्यामध्ये भरणा केले जातील अशा आशयाचे संस्थेचे अध्यक्ष व सेक्रेटरी यांचेकडून हमीपत्र कर्ज उचलीपूर्वी रु.२००/- स्टॅम्प पेपरवर द्यावयाचे आहे. असे हमी पत्र देवूनही संस्थेने अन्य बँकेत चेक्स भरणा केल्यास अध्यक्ष व सेक्रेटरी यांचेविरुध्द कायदेशीर कारवाई करण्यात येईल.

१३. संस्थेची हिशेबी पुस्तके, इतर कागदपत्रे व मालमत्ता वगैरे केव्हाही तपासण्याचा अधिकार बँकेस राहील.

१४. व्याजाची आकारणी दरमहा केली जाईल व असे होणारे व्याज त्वरीत कर्ज खाती वसुलीस पात्र राहील. बँक वेळोवेळी कर्जाच्या व्याजदरांमध्ये बदल करेल त्यावेळी निर्धारित केलेले व्याजदर लागू होतील.

१५. बँकेचा संस्थेच्या मालमत्तेवर प्रथम श्रेणीचा हक्क राहील.

१६. बँक कर्जाची परतफेड मुदतीत न केल्यास थकबाकीवर २ टक्के जादा दंडाचे व्याज आकारण्यात येईल.

१७. संस्थेला दिलेल्या कर्जापोटी येणे असलेल्या कर्ज रक्कमेसाठी संस्थेच्या ठेवीतून कर्ज खाती वजावट करावयाचा हक्क बँक राखून ठेवीत आहे.

१८. संस्थेने---------------------------- शाखा----------------- मुंबईमध्ये असलेल्या चालू / बचत खात्यांतील रक्कम मा.कार्यकारी संचालक यांचे सुचनेनुसार कमी करुन या बँकेकडे वर्ग करावी. या खात्याबाबत बँकेने तयार केलेल्या नमुन्यात "अधिकार पत्र " देणे संस्थेवर बंधनकारक आहे.

१९. संस्थेकडे दिनांक --------- च्या ताळेबंद पत्रकाप्रमाणे सभासदांच्या भागांची रक्कम रु.____________लाख इतकी आहे. बँक कर्ज उचलीच्या कालावधीत सदरच्या रकमेत घट झाल्यास त्याप्रमाणे कर्ज मर्यादेत कपात करणेत येईल.

२०. सभासदांस द्यावयाच्या मजूरीतून ५ टक्के रक्कम कपात करुन संस्थेने आपले भाग भांडवल वाढविले पाहिजे.

२१. संस्थेने सर्व प्रकारच्या विमापॉलिसी बँकेने वेळोवेळी टायअप केलेल्या विमा कंपनीकडून उतरविणे आवश्यक राहिल.

२२. संस्थेस कर्ज नुतनीकरण अर्ज सादर करणेस मुळमुदतीनंतर एक महिन्याचा ग्रेस पिरीयड देण्यात येईल. मात्र तद्नंतर कर्ज नुतनीकरण अर्ज सादर न केल्यास प्रतीमहा रु.१२००/- लेट फी आकारण्यांत येईल व सदरची रक्कम संस्थेच्या कर्ज खाती नावे टाकून वसुल करण्यांत येईल.

२३. संस्थेच्या कर्ज खात्यावरील येणेव्याजाची रक्कम सातत्याने ९० दिवसांपेक्षा जास्त काळ थकीत राहील्यास अशा थकीत व्याजाच्या रक्कमेवर त्या त्या कर्जाच्या संमत दराच्या १% जादा व्याजदराने आकारणी करण्यांत येईल.

२४. अटी व शर्ती पैकी कोणत्याही अटीचे समाधानकारक पालन होत नाही. असे आढळून आल्यास कर्ज खात्यावरील येणेबाकी व्याजासहित परत मागणेचा अधिकार बँक राखून ठेवीत आहे.

२५. संस्थेस बिलापोटी मिळणारे चेक्स संस्था व मुंबई जिल्हा मध्यवर्ती सह. बँक लि. यांचे संयुक्त नावे काढले जातील अशा आशयाची नोंद लेबर फेडरेशन यांचे शिफारस पत्र सादर केले नंतरच मंजूर कर्जावर कर्ज उचल देणेत येईल व अशी शिफारस पत्रेच कर्ज उचलीच्या वेळी ग्राह्य धरण्यांत येतील व येणे बिलाच्या ८०% पर्यंत उचल मर्यादा देण्यांत येईल.

२६. उपरोक्त पैकी कोणत्याही अटीत बदल करण्याचा वगळण्याचा अथवा जादा अट समाविष्ट करण्याचा अधिकार बँकेकडे राहील.

Z:\Vaishu\Karj Dhoran ati 2014\Majur sahakari.doc